MHPU060019312012

**नि.फौ.ख.क्र.** ७६७/**२०१२**

**शासन-वि**-फरीद व इतर

## निशाणी क्रं. १ खालील आदेश

प्रस्तुत खटला आरोपी क्र. १ ते ४ विरुध्द भा.द.वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४ महाराष्ट्र विद्यापीठ, बोर्ड व इतर नमूद परिक्षांमध्ये होणा–या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ व ८ अन्वये दाखल झालेला आहे. तसेच सदर खटल्यातील आरोपी क्र. ४ नामे– अहमद कारवान सोहेल हा आरोपी फरार असल्यामुळे, सदर खटला केवळ उर्वरित आरोपी क्र. १ ते ३ यांच्याविरुध्द चालविण्यात आलेला आहे. तसेच सदर खटलयातून सदर आरोपी क्र. १ ते ३ यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. तसेच सदर खटल्यातील उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये सदर आरोपी क्र. ४ विरुध्द देखील काहीही ठोस दोषात्मक पुरावा नाही. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदर आरोपी क्र. ४ विरुध्द दोषारोप ठेवण्या इतपत प्रथमदर्शी पुरावा देखील अभिलेखावर नाही. त्यामुळे सदर खटल्याचे जुने वय व उपरोक्त सर्व तथ्य परिस्थिती विचारात घेता, सदर खटला आरोपी क्र. ४ याच्याकरिता प्रलंवित ठेवून, वेगळे काहीही निष्पन्न होणार नाही.

करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

१ प्रस्तुत खटल्यातील आरोपी क्र. ४ नामे– अहमद कारवान सोहेल याची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २३९ नुसार भा.द.वि. कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह कलम ३४ महाराष्ट्र विद्यापीठ, बोर्ड व इतर नमूद परिक्षांमध्ये होणा–या गैरव्यवहारांना प्रतिबंध अधिनियम १९८२ चे कलम ७ व ८ अन्वये या दोषारोपातून दोषमुक्तता करण्यात येते.

२. सदर आरोपी क्र. ४ नामे– अहमद कारवान सोहेल विरुध्द भविष्यात सबळ पुरावा मिळून आल्यास, तपासअधिकारी यांना सदर गुन्हयाबाबत वेगळे पुरवणी आरोपपत्र दाखल करण्याचे स्वातंत्र्य राहील.

३. येणे प्रमाणे प्रस्तुत खटल्याची पुढील कार्यवाही बंद करण्यात येते.

Shri. Bharat Santaram Jagdale

Digitally signed by Shri. Bharat Santaram Jagdale
Date: 2026.06.15 17:39:56 +0530

ठिकाण :– पुणे.

दिनांक :– १५/०६/२०२६

(भरत सं. जगदाळे)

सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

लष्कर न्यायालय, पुणे.